सत्यमेव जयते
महाराष्ट्र शासन

## जिल्हाधिकारी कार्यालय पुणे (महसूल शाखा) - ४११००१

E- mail - mahsulpune2@gmail.com
Ph. No. 020 - 2611480

Inward No. 5274
Date: 04/11/2023

वाचले:- १) सहकार्यवाह, भारती विदयापीठ पुणे यांचेकडील पत्र क्र. भावि/मका/इस्टेट/७९०४/२०१८-२०१९ दि.२९/०१/२०१९

२) मा. अवर सचिव, महसुल व वनविभाग मंत्रालय मुंबई यांचेकडील शासन ज्ञापन क्र. जमीन १४२०००/म-९-२५९/प्र.क्र.पु.२०४७/ज-५ दि. २४/०८/२००४

३) जिल्हाधिकारी कार्यालयाकडील आदेश क्र. पमह/११२०/२००४ दि.०३/११/२००४

४) जिल्हाधिकारी कार्यालयाकडील आदेश क्र. पमह/कावि/११२०/०४-०६ दि.१२/०६/२००६

५) जिल्हाधिकारी कार्यालयाकडील आदेश क्र. पमह/एनए/एसआर/९९६/2011 दि.१२/११/२०१२

६) उपविभागीय अधिकारी हवेली यांचेमार्फत त्यांचेकडील पत्र क्र. जमीन/कावि/१९७२/२०२३ दि.२०/१०/२०२३

७) शासन, महसूल व वन विभागाकडील शासन निर्णय क्र. जमीन-२०१८/प्र.क्र.९१/ज-१, दि.१६ नोव्हेंबर, २०१८

८) महाराष्ट्र जमीन महसूल (सरकारी जमिनींची विल्हेवाट लावणे) नियम १९७१ चे नियम ७

---

जिल्हाधिकारी
सत्यमेव जयते
पुणे

क्र. पमह/सीआर/५८/२०२३
पुणे १ दिनांक:-०२/११/२०२३

**विषय:-** मौजे लोहगाव ता. हवेली जि.पुणे येथील स.नं ३५ मधील क्रिडांगणासाठी १२०००.०० चौ.मी क्षेत्रास भाडेपट्ट्याची मुदतवाढ देणेबाबत...

**आदेश/-**

ज्याअर्थी, सहकार्यवाह, भारती विदयापीठ पुणे यांचेकडील पत्र क्र. भावि/मका/इस्टेट/७९०४/२०१८-२०१९ दि.२९/०१/२०१९ रोजी अर्ज करुन मौजे लोहगाव ता. हवेली जि.पुणे येथील स.नं. ३५ मधील क्रिडांगणासाठी १२०००.०० चौ.मी क्षेत्रास भाडेपट्ट्याची मुदतवाढ मिळणेबाबत विनंती केलेली आहे.

२. त्याअनुषंगाने तहसिलदार हवेली यांनी त्यांचेकडील पत्र क्र. जमीन-१/कावि/२४४६/२०२३ दि.१९/१०/२०२३ (प्राप्त दि.२३/१०/२०२३) अन्वये उपविभागीय अधिकारी हवेली यांचेमार्फत त्यांचेकडील पत्र क्र. जमीन/कावि/१९७२/२०२३ दि.२०/१०/२०२३ अन्वये मौजे लोहगाव, ता. हवेली जि. पुणे येथिल सं. न. ३५ मधील ३ एकर जमिन क्रिंडागणासाठी मंजूर करण्यात आलेल्या क्षेत्राचा भाडेपट्ट्यास मुदतवाढ मिळणेबाबत दिलेल्या निवेदनानुसार प्रकरणी सविस्तर चौकशी करून आपले मार्फत अहवाल सादर करणेच्या सूचना प्राप्त झाल्या आहेत. त्याअनुषंगाने तहसिलदार हवेली यांचेकडील अहवालानुसार खालीलप्रमाणे अहवाल सादर केलेला आहे.

मौजे लोहगाव, ता. हवेली, जि.पुणे येथील सं.न. ३५ चा ७/१२ पाहता, जिल्हाधिकारी पुणे यांचे कार्यालयाकडील आदेश क्र पमह/११२०/२००४ दि. ०३/११/२००४ अन्वये भारती विदयापीठ पुणे यांना शाळेसाठी व क्रिडागणांसाठी ०१ हे ९२ आर क्षेत्र फेरफार क्रमांक २३६३६ नुसार अटी व शर्तीवर भाडेपट्ट्याने प्रदान करणेत आलेली आहे. त्याच प्रयोजनासाठी वापर चालु असल्याचे दिसून येत आहे. तसेच कोणत्याही प्रकारचा शर्तभंग झाला नसल्याचे दिसून येते. तसेच अर्जदार यांनी शासकीय नियमानुसार भाडेपट्ट्याची होणारी रक्कम शासकीय कोषागारात भरून चलनाची प्रत सादर करणार आहेत.

विषयांकित मिळकतीची मंडल अधिकारी कळस यांनी दिनांक १७/१०/२०२३, रोजी समक्ष पाहणी केली असून, सदर पंचनाम्यानूसार मौजे लोहगाव ता. हवेली जि. पुणे येथिल सं. न. ३५ मध्ये भारती विदयापीठ पुणे यांच्या नावे क्षेत्र १९२००.०० चौ.मी दाखल असल्याचे दिसून येत असून, सदर क्षेत्रामध्ये शाळेची इमारत व क्रिडागण असून आजरोजी वापर चालु असलेबाबत पंचनाम्यामध्ये नमुद केले असलेचे अहवालामध्ये नमुद केलेले आहे.

३. मा. अवर सचिव, महसुल व वनविभाग मंत्रालय मुंबई यांचेकडील शासन ज्ञापन दि.२४/०८/२००४ अन्वये मौजे लोहगाव ता. हवेली जि.पुणे येथील सं.नं. ३५ मधील ४०००.०० चौ.मी जागा इंग्रजी माध्यम शाळा इमारत, ४०००.०० चौ.मी क्षेत्र वस्तीगृहासाठी कब्जेहक्काने व १२०००.०० चौ.मी क्षेत्र भाडेपटटयाने १५ वर्ष कालावधीसाठी क्रिडांगण या प्रयोजनासाठी प्रदान करणेस मान्यता देणेत आलेली आहे. जिल्हाधिकारी कार्यालयाकडील आदेश क्र. पमह/११२०/२००४ दि.०३/११/२००४ अन्वये मौजे लोहगाव ता. हवेली जि.पुणे येथील सं.नं. ३५ मधील ४०००.०० चौ.मी जागा इंग्रजी माध्यम शाळा इमारत, ४०००.०० चौ.मी क्षेत्र वस्तीगृहासाठी कब्जेहक्काने व १२०००.०० चौ.मी क्षेत्र भाडेपटटयाने १५ वर्ष कालावधीसाठी क्रिडांगण या प्रयोजनासाठी प्रदान करणेत आलेला आहे. तदनंतर पुनश्चं जिल्हाधिकारी कार्यालयाकडील आदेश क्र. पमह/कावि/११२०/०४-०६ दि.१२/०६/२००६ अन्वये पुर्वी मंजर केलेल्या २००००.०० चौ.मी क्षेत्राऐवजी सुधारीत रेखांकनातील भुखंड क्र. ३ चे १९२००.०० चौ.मी क्षेत्र मंजुर करणेत आलेले आहे. जिल्हाधिकारी कार्यालयाकडील आदेश क्र. पमह/एनए/एसआर/९९६/२०११ दि.१२/११/२०१२ अन्वये मौजे लोहगाव ता. हवेली जि.पुणे येथील सं.नं. ३५ मधील १९२००.०० चौ.मी क्षेत्रास अकृषिक परवानगीसह बांधकाम आराखडयांना मंजुरी देणेत आलेली आहे.

४. **ज्याअर्थी, शासन, महसूल व वन विभागाकडील शासन निर्णय क्र. जमीन-२०१८/प्र.क्र.९१/ज-१, दि.१६ नोव्हेंबर, २०१८ अन्वये क्रिडांगण किंवा खेळाचे मैदान, व्यायामशाळा या प्रयोजनासाठी भाडेपट्टयाने प्रदान केलेल्या शासकीय जमिनीवरील भाडेपट्टयाचे नुतनीकरण करताना जमिनीच्या प्रचलित वार्षिक दर विवरण पत्रानुसार मुल्यांकनाच्या १० टक्के रकमेच्या ०.१ टक्के इतकी रक्कम वार्षिक भुईभाडयाची रक्कम आकारुन मुळ जमीन प्रदान आदेशातील अटी शर्तीच्या अधीन राहून ३० वर्षाचे भाडेपट्टयाची मुदतवाढ देण्यात यावी. अशी मुदतवाढ देताना ज्या भाडेपट्टयांचा कालावधी या शासन निर्णयाच्या दिनांकापुर्वी संपुष्टात आलेला व ज्या भाडेपट्टयांचे अद्याप नुतनीकरण करण्यात आलेले नाही, अशा भाडेपट्टयांचे मानीव नुतनीकरण भाडेपट्टा संपुष्टात आल्याच्या दिनांकापासून दि.३१.१२.२०१७ पर्यंत जुन्या दराने भुईभाडे वसुल करुन करण्यात यावे व दि.०१.०१.२०१८ पासुन प्रस्तुत धोरणानुसार भुईभाडे वसुल करुन भाडेपट्टयाचे पुढील नुतनीकरण करण्यात यावे अशी तरतुद करण्यात आलेली आहे.**

प्रस्तुत संस्थेस जमीनीच्या वार्षिक मुल्यदर तक्त्याच्या विवरण पत्रानुसार येणाऱ्या मुल्यांकन रक्कम रुपये **१४५२०००००/-** या रकमेच्या १० टक्के रक्कम रुपये **१४५२०००/-** या रकमेच्या ०.१ टक्का रक्कम रुपये **१४५२०/- इतकी होत आहे.** त्यानुसार दिनांक १६/११/२०१८ रोजीचे शासन निर्णयानुसार दिनांक दि.०१/०१/२०१८ ते ३१/१२/२०२३ पर्यंत भुईभाडे म्हणून होणारी एकुण रक्कम रुपये ७२६००/- इतकी रक्कम रुपये संस्थेने दि.३१/१०/२०२३ रोजी GRN No. MH०१०१४९०४२२०२३२४E अन्वये (GRAS) प्रणालीव्दारे शासकीय खजिन्यात जमा केले असून सदर चलन डिफेस झाले आहे.

त्याअर्थी **मी, डॉ राजेश देशमुख, जिल्हाधिकारी पुणे,** मला प्रदान केलेल्या अधिकारान्वये शासन निर्णय क्र. जमीन-२०१८/प्र.क्र.९१/ज-१, दि.१६ नोव्हेंबर, २०१८ मधील तदतुदीनुसार सहकार्यवाह, भारती विदयापीठ पुणे यांना मौजे लोहगाव ता. हवेली जि.पुणे येथील स.नं ३५ मधील क्रिडांगणासाठी १२०००.०० चौ.मी क्षेत्रास मुळ जमीन प्रदान आदेशातील अटी शर्तीच्या अधीन राहून खालील अटी व शर्तीवर दि. ०१/०१/२०१८ पासून दि.३१/१२/२०४८ या ३० वर्षांकरीता भाडेपट्टयास मुदतवाढ देणेस मंजुरी देत आहे.

**अटी व शर्ती:-**

१. प्रस्तुत संस्थेस क्रिडांगणाच्या भाडेपट्टयाचे मुदतवाढ दिलेल्या क्षेत्राचा वापर त्याच प्रयोजनासाठी करणे प्रतिग्रहीता संस्थेस बंधनकारक राहील.

२. प्रस्तुत संस्थेस मुळ जमीन प्रदान केलेल्या आदेशातील अटी शर्ती प्रतिग्रहीता संस्थेस बंधनकारक राहतील.

३. शासन निर्णय दि.१६ नोव्हेंबर, २०१८ मध्ये नमूद केल्याप्रमाणे क्रिडांगणाच्या जमिनीच्या दरसाल प्रचलित
वार्षिक दर विवरण पत्रानुसार येणाऱ्या मुल्यांकनाच्या १० टक्के रकमेच्या ०.१ टक्के इतकी वार्षिक
भुईभाडयाची रक्कम शासनाकडे/ तहसिलदार हवेली/तलाठी यांचेकडे भरणे संस्थेस बंधनकारक राहील.

४. सदर संस्थेच्या क्रिडांगणाचे क्षेत्राकरीता भाडेपट्टयाची मुदत ही दि.०१/०१/२०१८ पासून दि.३१/१२/२०४८
या ३० वर्षाकरीता असून भाडेपटटयाने प्रदान केलेल्या किंडांगणाच्या १२०००.०० चौ.मी क्षेत्राची नोंद
७/१२ चे इतर हक्कात घेण्यात यावी.

५. सदर संस्थेस मुदतवाढ दिलेल्या भाडेपट्टयाच्या जागेबाबत शासन परिपत्रक क्र.संकिर्ण-०५/२००६/
प्र.क्र.४३/ज-१, दि.३१ ऑक्टोबर, २००६ अन्वये दिलेल्या निर्देशानुसार मुंबई मुद्रांक अधिनियम १९५८
नुसार करारनाम्याचा दस्त निष्पादित करणे प्रतिग्रहीता यांचेवर बंधनकारक राहील.

६. विषयांकीत मिळकतीबाबत जिल्हाधिकारी कार्यालयाकडील दि.०३/११/२००४ रोजीच्या मुळ जागा प्रदान
आदेशातील अटी शर्ती अर्जदार संस्थेवर बंधनकारक राहतील.

७. विषयांकीत मिळकतीवर उभारण्यात आलेल्या क्रिडांगण/ शैक्षणिक संकुलाच्या इमारतीमध्ये केंद्र व राज्य
शासनाच्या विविध विभागाकडुन घेण्यात येणाऱ्या स्पर्धा परीक्षा, तसेच सार्वत्रिक निवडणुका, राज्य शासनाच्या
निर्देशानुसार जिल्हाधिकारी कार्यालयाकडुन राबविण्यात येणारे सार्वजनिक उपक्रम यासाठी वेळोवेळी सदरची
खुली जागा, जागेवरील इमारत व तदनुषंगिक उपलब्ध असलेली तांत्रिक यंत्रसामुग्री, तांत्रिक मनुष्यबळ
विनासायास व विनामुल्य तातडीने उपलब्ध करुन देणे प्रतिग्राहिता यांचेवर बंधनकारक राहील.

८. प्रतिग्रहीता यांनी सदर आदेशातील वरील सर्व अटी व शर्ती मान्य असल्याबाबत रु.१००/- चे स्टॅम्प पेपरवर
हमीपत्र सादर करणे प्रतिग्रहीता यांचेवर बंधनकारक राहील.

९. संस्थेने वरील अटी व शर्तींचा भंग केल्यास सदर जमीन शर्तभंगात काढून घेवून सरकार जमा केली
जाईल.

जिल्हाधिकारी पुणे

(डॉ राजेश देशमुख)
जिल्हाधिकारी पुणे

प्रति,
सहकार्यवाह,
भारती विदयापीठ
भारती विदयापीठ भवन
लाल बहादुर शास्त्री मार्ग पुणे -३०

अहवाल दिनांक : 14/02/2024

# महाराष्ट्र शासन

## गाव नमुना सात ( अधिकार अभिलेख पत्रक )

[ महाराष्ट्र जमीन महसूल अधिकार अभिलेख आणि नोंदवह्या ( तयार करणे व सुस्थितीत ठेवणे ) नियम, १९७१ यातील नियम ३,५,६ आणि ७ ]

ाव :- **लोहगाव** ( 556231 ) तालुका :- **हवेली** जिल्हा :- **पुणे**

ULPIN : 11860811591 भूमापन क्रमांक व उपविभाग : 35 11860811591

भू-धारणा पध्दती : **सरकार** शेताचे स्थानिक नाव :

**क्षेत्र, एकक व आकारणी**

| | |
|---|---|
| क्षेत्राचे एकक | हे.आर.चौ.मी |
| अ) लागवड योग्य क्षेत्र | |
| जिरायत | - |
| ागायत | - |
| ब) पोट-खराब क्षेत्र (लागवड अयोग्य) | |
| र्ग (अ) | 31.92.00 |
| र्ग (ब) | - |
| ुण पो.ख. | 31.92.00 |
| ुण क्षेत्र (अ+ब) | 31.52.00 |
| आकारणी | 0.00 |
| ुडी किंवा विशेष आकारणी | - |

| खाते क्र. | भोगवटादाराचे नांव | क्षेत्र | आकार | पो.ख. | फे.फा. |
|---|---|---|---|---|---|
| 266 | मराठवाडा मित्र मंडळ 302/अ डेक्कन जिमखाना पुणे 4 तर्फे चिटणीस शैक्षणिक उपक्रमाकरिता | | | 5.66.50 | ( 23122 ) |
| | पुर्व प्राथमिक व माध्यमिक शाळेसाठी व वस्तीगृहासाठी व क्रिडांगणासाठी | | | | ( 23122 ) |
| | ------सामाईक क्षेत्र------ | 0.00.00 | 0.00 | 5.66.50 | |
| 535 | भारती विद्यापीठ पुणे शाळेसाठी | | | 1.92.00 | ( 23626 ) |
| [781] | [~~डिफेन्स पर्सनल को.ऑ.हौ.सो. पुणे~~ | | | ~~1.86.00~~ ] | ( 55048 ) |
| 909 | कन्नड संघ पुणे | | | 3.36.00 | ( 24553 ) |
| 3221 | कासेगांव एज्युकेशन सोसा | | | 1.92.00 | ( 24610 ) |
| 7773 | जिल्हा शल्य चिकीत्सक जिल्हा रुग्णालय पुणे | | | 2.40.00 | ( 40317 ) |
| 16266 | मुक्त गायरान | | | 12.79.50 | ( 40318 ) |
| 20014 | शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था, येरवडा | | | 2.00.00 | ( 40318 ) |
| 35436 | सिव्हील डिफेन्स सहकारी गृहरचना संस्था मर्यादित | | | 1.86.00 | ( 55048 ) |

**कुळ, खंड व इतर अधिकार**

कुळाचे नाव व खंड

इतर अधिकार
इतर
इतर
इतर
नविन शर्तीवर ( 23122 )
इतर
इतर
इतर
इतर
इतर
ग्रामपंचायत लोहगांव देखभाल करणेसाठी ( 25040 )
गौण खनिज दंड
अनाधिकृत गौणखनिज उत्खनन दंड र रु. 781648/- चा बोजा 1) ग्रामपंचायत लोहगांव 2) देवकर अर्थमुव्हर्स तर्फे श्री. तुकाराम देवकर यांच्या हिस्सा ( 43838 )
भाडे तत्वाने
भारती विद्यापीठ पुणे यांना भाडेपट्ट्याने किडांगणासाठी क्षेत्र 12000.00 चौ. मी. मुदत दि 01/01/2018 पासुन दि 31/12/2048 पर्यंत 30 वर्षाकरीता ( 56207 )

प्रलंबित फेरफार : नाही.

शेवटचा फेरफार क्रमांक : 56207 व दिनांक : 14/02/2024

सीमा आणि भुमापन चिन्हे :

जुने फेरफार क्र. ( 3985 )( 9683 )( 18650 )( 23122 )( 23626 )( 24183 )( 24553 )( 24610 )( 24654 )( 40317 )( 40318 )( 43247 )

True copy

Principal
Bharati Vidyapeeth
English Medium School
Lohagaon, Pune-411047.

## गाव नमुना बारा ( पिकांची नोंदवही )

[ महाराष्ट्र जमीन महसूल अधिकार अभिलेख आणि नोंदवह्या ( तयार करणे व सुस्थितीत ठेवणे ) नियम,१९७१ यातील नियम २९ ]

गाव :- **लोहगाव ( 556231 )** तालुका :- **हवेली** जिल्हा :- **पुणे**

भूमापन क्रमांक व उपविभाग : **35**

| | | | पिकाखालील क्षेत्राचा तपशील | | | | | लागवडीसाठी उपलब्ध नसलेली जमीन | | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| वर्ष | हंगाम | खाता क्रमांक | पिकाचा प्रकार | पिकाचे नाव | जल सिंचित | अजल सिंचित | जल सिंचनाचे साधन | स्वरूप | क्षेत्र | |
| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) | (७) | (८) | (९) | (१०) | (११) |
| | | | | | हे.आर. चौ.मी | हे.आर. चौ.मी | | | हे.आर. चौ.मी | |
| 2019-20 | खरीप | | मिश्र | वणीकरन | 2.0000 | | | | | |
| | | | | | | | | बांधकाम पड | 20.7200 | |
| | | | | | | | | शाळा व क्रिडांगण | 0.4000 | |
| | | | | | | | | स्मशान भूमी | 0.8000 | |
| | | | | | | | | तळे | 7.0000 | |

टीप : * सदरची नोंद मोबाइल ॲप द्वारें घेणेतं आलेली आहे

**"या प्रमाणित प्रतीसाठी फी म्हणून १५/- रुपये मिळाले."**
**दिनांक :-** 20/02/2024
**सांकेतिक क्रमांक :-**

( नाव :- उषा अंगद मुंढे )
**तलाठी साझा :-** लोहगाव **ता :-** हवेली **जि :-**पुणे

तलाठी लोहगाव
ता. हवेली, जि. पुणे

गाव नमुना ६

फेरफार नोदंवही ( फेरफार पत्रक )

[ महाराष्ट्र जमीन महसुल अधिकार अभिलेख आणि नोदंवह्या ( तयार करणे व सुस्थितीत ठेवणे ) नियम, १९७१ यातील नियम १० ]

**गाव :-** लोहगाव **तालुका :-** हवेली **जिल्हा :-** पुणे

| नोंदीचा अनुक्रमांक | संपादन केलेल्या अधिकाराचे स्वरुप | परिणाम झालेले भुमापन व उपविभाग क्रमांक | अधिकाऱ्याचे नाव , आद्याक्षरी व शेरा |
|---|---|---|---|
| 56207 | फेरफाराचा प्रकार : अनोंदणीकृत<br>नोंदीचा प्रकार : आदेश व दस्तावेज फेरफाराचा दिनांक : 19/01/2024 माहिती मिळालेचा दिनांक :- 19/01/2024<br>अधिकारी : जिल्हाधिकारी<br>आदेश क्रमांक : पमह/सीआर/19/2023<br>आदेश दिनांक : 02/11/2023<br><br>मा. जिल्हाधिकारी सो पुणे यांजकडील आदेश क्र.पमह/सीआर/19/2023 दिनांक 02/11/2023 अन्वये मौजे लोहगाव ता. हवेली जि. पुणे येथील स. नं. 35 मध्ये इतर हक्कात भारती विद्यापीठ पुणे यांना भाडेपट्ट्याने किडांगणासाठी क्षेत्र 12000.00 चौ. मी. मुदत दि 01/01/2018 पासुन दि 31/12/2048 पर्यंत 30 वर्षाकरीता असा शेरा आदेशातील अटी व शर्त क्र. 4 नुसार दाखल केले. आदेशातील अटी व शर्त क्र. 1 ते 9 या अटी व शर्तीचा भंग केल्यास सदर जमीन शर्तभंगात काढुन घेवून सरकार जमा केली जाईल. आदेशाने नोंद आदेश फायलीस दाखल असे.<br><br>हितसंबधितांना नोटीस बजावल्याचा दि. 29/01/2024<br>फेरफार नोंद निर्गतीचा दि. 14/02/2024<br><br>( उषा अंगद मुंढे)<br>तलाठी<br>लोहगाव साझा लोहगाव ता. हवेली जि. पुणे | 35(मंजूर)<br><br>**एकूण :-** 1 | आदेशाची प्रत पाहिली सबब नोंद प्रमाणित.<br><br>(सत्यवान कुंडलिक लांडगे)<br>मंडळ अधिकारी:- कळस<br>ता.: हवेली<br>जि.: पुणे<br>दि.: 14/02/2024 |

**"या प्रमाणित प्रतीसाठी फी म्हणून १५/- रुपये मिळाले."**
**दिनांक :-** 20/02/2024
**सांकेतिक क्रमांक :- 272500070312280000220243738**

( **नाव :-** उषा अंगद मुंढे )
**तलाठी साझा :-** लोहगाव **ता :-** हवेली **जि :-**पुणे

**तलाठी लोहगांव**
**ता. हवेली, जि. पुणे**

True copy

Principal
Bharati Vidyapeeth
English Medium School
Lohagaon, Pune-411047.